क्रमांक: ९०/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: ४ जानेवारी, २०२२

<u>:: कार्यालयीन आदेश ::</u>

मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या आस्थापनेवर **"उच्चश्रेणी लघुलेखक"** (एस-१५:४१८००-१३२३००) या नामाभिधानाची दोन पदे अस्तित्वात आहेत. त्यापैकी एका पदाचे नामाभिधान **"विशेष कार्य अधिकारी"** (एस-१५:४१८००-१३२३००) असे करुन या पदावर श्री.नितिन मा. पाटील, संशोधन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांची दिनांक १ जानेवारी, २०२२ (म.पू.) पासून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या आस्थापनेवरील **नामाभिधान बदलण्यात आलेल्या सदरहू "विशेष कार्य अधिकारी"** पदाची कालमर्यादा मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या पदावधीपर्यंत किंवा **श्री. पाटील, संशोधन अधिकारी** हे प्रतिनियुक्तीने उक्त पदावर कार्यरत असेपर्यंत यापैकी जो अगोदरचा कालावधी असेल तोपर्यंतच राहील. तद्नंतर उक्त पदाचे नामाभिधान **"उच्चश्रेणी लघुलेखक"** असे होईल.

आदेशानुसार
(सुभाष नलावडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

श्री.नितिन मा. पाटील, संशोधन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रतिलिपी :-**

१) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

२) अतिरिक्त मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) "क-२" (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) निवडनस्ती.